**प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प शहापुर**

गंगादेवस्थान जवळ , मौजे वाफे , ता.शहापुर जि. ठाणे दुरध्वनी क्रमांक :-९५२५२७-२७२१५७

ईमेल :- poitdp.shahapur_mh@gov.inÃÖ

महाराष्ट्र शासन

जा .क्र.शाआशा-२०१८/प्र.क्र.३१८/का.३(७)/ /शहापुर दिनांक :- /११/२०१८

## जाहिर सुचना

प्रति,

१. क्लासिक जनरल स्टोअर्स जव्हार
२. प्रगती आदिवासी महिला मंडळ
३. नॅशनल ट्रेडर्स जव्हार
४. प्रकाश मुकुंद वरकुटे
५. प्रगती मित्र मंडळ पेंढरघोळ
६. आशिष ट्रेडींग कंपनी साल

विषय :- शासकीय आश्रम शाळा सन २०१८-१९ करीता प्रकल्प स्तरीय क्रिडास्पर्धा साहित्य खरेदीची बैठक दि.१२/११/२०१८ रोजी सायंकाळी ४.०० वाजता उपस्थित रहाणे बाबत.

उपरोक्त विषयान्वये कळविण्यांत येते की, या कार्यालयाचे अधिनस्त असलेल्या शासकीय व अनुदानित आश्रम शाळा सन २०१८-१९ कालावधीतील प्रकल्प स्तरीय क्रिडा स्पर्धा साहित्य खरेदी साठी ई- निविदा पध्दतीने निविदा मागविण्यांत आलेल्या आहेत. त्यानुसार प्राप्त झालेल्या निविदा धारकांचे तांत्रिक लिफाफा उघडणे करीता दि.२९/१०/२०१८ रोजी ४.०० वाजता बैठक आयोजित करण्यांत आलेली होती. सदर बैठकीत आशिष ट्रेडींग कंपनी साल सोडुन इतर सर्व निविदाधारक उपस्थित होते.

सदर बैठकीत निविदा धारकांसमक्ष निविदेतील डाऊन लोड केलेल्या तांत्रिक लिफाफयातील कागदपत्रांची पडताळणी केली असता निविदा धारकांना आशिष ट्रेडींग कंपनी साल यांचे बँक सॉलवंशी दिसुन न आल्यामुळे त्यांचा लिफाफा क्र.२ उघडण्यांत येऊ नये अशी हरकत घेतलेली आहे. तसेच नॅशनल ट्रेडर्स जव्हार यांचा अनुभव दाखला दिसुन येत नसल्यामुळे त्यांचा लिफाफा क्र.२ उघडण्यांत येऊ नये अशी हरकत घेतलेली आहे.

तरी उक्त सर्व निविदा धारकांनी आपले निविदेतील मुळ कागदपत्रांची तपासणी व निविदेतील तक्रारीचे निरसण करणे करीता दि.१२/११/२०१८ रोजी सायंकाळी ४.०० वाजता या कार्यालयात बैठक आयोजित केलेली सदर बैठकीस स्वतत: निविदा धारकांनी उपस्थित रहावे. आपण सदर बैठकीस उपस्थित न राहिल्यास नंतर कोणत्याही प्रकारची तक्रार ग्राहय धरली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

प्रकल्प अधिकारी
एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प
शहापूर जि.ठाणे.